# शिवराज

१९८०-८



शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज

डी. एम. सुरंगे
४ मे, ८१.

# 'शिवराज'

नियतकालिक १९८०–८१

शिवराज महाविद्यालय,
गडहिंग्लज.

★★

संपादन – समिती

अध्यक्ष :
प्राचार्य बलवन्त देशमुख

प्रमुख संपादक :
प्रा. कृ. मे. केसरकर

सह. संपादक :
प्रा. सौ. एम. एन. कोटीभास्कर
प्रा. जी. जी. गुळवणी
प्रा. सौ. एस. एम. जगताप

जाहिरात विभाग :
प्रा. सी. एस गवसणे
प्रा. एन. डी. खिचडी


रचना – कला
प्रा. चंद्रहास धुमाळ

मुखपृष्ठ :
श्री. महादेव नाडगोंडे
बी. कॉम भाग तीन

★★


मुद्रक :
झुंजार प्रिंटींग प्रेस, निपाणी






कर्मवीर कै. विठ्ठल रामजी शिंदे

संस्थापक – अध्यक्ष



खासदार बाळासाहेब माने



प्राचार्य बलवंत देशमुख

# 'संपादकीय'

महाविद्यालयाचा वार्षिक अंक हे कॉलिजने त्या वर्षी अनुभवलेले कला, क्रीडा व साहित्य विश्वातील एक स्वप्न असते असे म्हणायला हरकत नाही. या वर्षी " शिवराज " वार्षिक अशाच प्रकारचे रंग-गंध घेऊन आपल्यासाठी प्रसिद्ध होत आहे, वेळेत प्रसिद्ध होत आहे, म्हणून आम्हास आनंद! हा अंक वेळेत व चांगला निघावा म्हणून प्राचार्य देशमुख यांच्या प्रेरणा, योग्य सूचना व त्यानी मला दिलेले पूर्ण स्वातंत्र्य याबद्दल मी त्यांचा प्रथम ऋण-निर्देश करू इच्छितो. अंक सजविण्यासाठी विभाग प्रमुख प्रा. सौ. मधुमालती कोटीभास्कर, प्रा. श्री गजानन गुळवणी व प्रा. सौ. सुहासिनी जगताप यानी मोलाचे साहाय्य केले आहे.

शिवराजच्या " छोटया साहित्यकांनी " आपल्या हृदयाची स्पंदने देखण्या शद्बात मांडली आहेत. त्यात कथा, कविता, लघु-निबंध, प्रवास वर्णने व टीकात्मक निबंध या सर्वांचा साज आहे. शिवराजचे बुद्धि-वैभव

मैदानावरचं यश आणि कला क्षेत्रातलं कौशल्य यांचसुद्धा दर्शन आपल्याला " शिवराज " मध्ये होईल. अंकासाठी आलेल्या सर्व साहित्याला अंकाच्या मर्यादेमुळे समाविष्ट करता आले नाही ही खंत! अंकाच्या मुखपृष्ठाचे डिझाईन आमचा बी.कॉम. भाग तीन मधील गुणी विद्यार्थी श्री महादेव नाडगोंडे याने कष्ट घेऊन तयार केले आहे त्याच्या कष्टाचे व कलेचे कौतुक केवळ शब्दांनी करता येणार नाही. गडाच्या शेजारी राजा शिवरायाचे नाव धारण करून प्रस्थापित झालेल्या आमच्या महाविद्यालयाची घोड–दौड चित्रकाराने अचूक टिपली आहे.

अंक वेळेवर व "चांगला" निघावा म्हणून प्रा. चंद्रहास धुमाळ व त्यांच्या निपाणी येथील "झुंझार" मुद्रणालयातील कामगारांनी खास परिश्रम घेतलेले आहेत अंकातील सर्व छाया चित्रांचे ब्लॉक्स " श्री लक्ष्मी प्रोसेस " कोल्हापूर यांनी वेळेत तयार करून दिले. या अंकासाठी अडी–अडचणीच्या वेळी महाविद्यालयाच्या कार्यालयीन कर्मचाऱ्यानी खूप मोठे सहकार्य दिले आहे.

अर्थात्, जाहिरात विभाग प्रमुख प्रा. गवसणे यांचे आभार शेवटी मानून मी त्यांचे महत्त्व कमी करीत नाही. शिवराज वार्षिकाची आर्थिक बाजू सांभाळण्याची फार मोठी जबाबदारी प्रा. गवसणे, प्रा.खिचडी व आमच्या गुणी विद्यार्थ्यांनी उचलली याबद्दल आम्हास धन्यता वाटते. ज्यानी उदार मनानी जाहिराती दिल्या त्या जाहिरातदारांचे शतशः आभार! हा सर्वांच्या कष्टाचा मोर–पिसारा आपल्या हाती सोपवताना मला आनंद होत आहे. आपण तो गोड मानून स्वीकाराल अशी आशा.

संपादक

**प्रा. कृ. भैं. केसरकर**

○○

# 'हृद्गत'

नील नभाच्या पार्श्वभूमीवर हिरवीगार, लुसलुशीत चैत्र पालवी फुलते. नूतन वर्षाच्या स्वागत–सोहळयासाठी कळया-फुलांतून गंधगीते उमलू लागतात. रेशमी झगझगीत उन्हे कधी कधी मावळतात नि आसुसलेल्या सृष्टीवर पावसाचे अमृततुषार पडताच, ओठी–पोटी तृप्त झालेली पृथ्वी, मृद्गंधातून आशिर्वच उधळू लागते. नववर्षाचा स्वागत-सोहळा पक्षोपक्षांच्या गळयात स्वरबद्ध होतो. तृप्ती–अतृप्तीच्या अनोख्या भावविश्वात सारी सृष्टीच डोलू लागते. अगदी अशाचवेळी शिवराज महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या भावविश्वाचे दर्शन घडविणारे 'शिवराज' हे वार्षिक रसिकांना सादर होते.

सागरात अवघ्या आकाशातील रंग–रूपाचे नितळ प्रतिबिंब सामावलेले असते त्या प्रमाणे विद्यार्थ्यांच्या हृदयसागरातील आशा.आकांक्षांची प्रतिबिंबे या वार्षिकात प्रतिबिंबित झालेली असतात वर्षभरातील चैतन्याने

रसरसलेले जीवनच सौंदर्याचा साज लेवून येथे आकाराला आलेले असते.

राजर्षि शाहू राजांच्या पदरजाने पूनित झालेल्या, महर्षि वि. रा. शिंदे यांच्या कृपामयी दृष्टीने शैक्षणिक जाण लाभलेल्या व शिवराजाच्या पराक्रमाचा डंका ऐकलेल्या, गडहिंग्लज नगरीतील या महाविद्यालयाला दिव्य भव्य इतिहासाचा तेजस्वी वारसा लाभलेला आहे.या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना म्हणूनच पराक्रमाची शौर्यगाथा लिहिण्याचा हव्यास आहे. यावर्षी अशीच पराक्रमगाथा, यशोगाथा खऱ्या अर्थाने 'शिवराज' ने लिहिली. विद्यापीठाच्या परीक्षेतील यश हेच खरे महाविद्यालयाचे यश. विद्यार्थी जीवनाला तेच प्रेयस नि श्रेयस.

"याचसाठी केला होता अट्टाहास! शेवटचा दीस गोड व्हावा"! ही विद्यार्थिमनाची धारणा व मूक प्रार्थना असते. या वर्षी मराठी विभागातील बी. ए. भाग ३ चा मराठी स्पेशलचा श्री. राजन गवस हा विद्यार्थी शिवाजी विद्यापीठात सर्वप्रथम आला. शिवराज कॉलेजच्या स्थापनेपासून हे महाविद्यालय ज्या यशाची आतुरतेने वाट पहात होते ते यश या वर्षी या गुणी विद्यार्थ्याने मिळवून दिले व तो 'शिवराज भूषण' ठरला.

तसेच कलेच्या क्षेत्रातही सन्मानाचा तुरा यावर्षी कलामंडळाने मिळविला.सांगलीच्या आकाशवाणी केंद्रावर कार्यक्रम सादर करून रसिकांची त्यानी वाहवा मिळविली. स्नेहसंमेलनात सादर केलेल्या नाटक करमणुकीने कलेचा सुंदर ताज उभा करून गडहिंग्लजच्या पंचक्रोशीतील गुणीजनांना, मनरंजनाची उत्तम पर्वणीच निर्माण करून दिली. बऱ्याच काळानंतर एवढा देखणा नाटयप्रयोग, त्यांच्याच विद्यार्थ्यांनी केलेला या नगरवासियांनी पाहिला व तृप्ततेची पोच पावतीही दिली.

बदामी–हम्पी ही प्राध्यापकांची दक्षिण भारताची सहल व दिल्ली आग्रा ही विद्यार्थ्यांची उत्तर भारताची सहल यामुळे तर हे शैक्षणिक वर्ष आनंदात न्हावून निघाले. विद्यार्थ्यांचे विविधांगी व्यक्तिमत्त्व विकसित करण्यासाठी या महाविद्यालयाने प्रयत्नांची पराकष्ठा चालविलेली आहे. त्यांना अधिकाधिक सोई सवलती देण्याचे प्रयत्न येथे चालले आहेत केवळ अर्ध तपाच्या वाटचालीत क. वि. रा. शिंदे शिक्षण संस्थेने उभ्या केलेल्या या महाविद्यालयाच्या वास्तू पाहिल्या तरी कोणत्याही सुजाण व्यक्तीला आश्चर्य वाटावे एवढी ही प्रगती निश्चितच आहे. या संस्थेचे अध्यक्ष माननीय खा. बाळासाहेब माने यांची प्रभावी प्रेरणा व कुशल आणि आपुलकीचे मार्गदर्शन, संस्थेचे पदाधिकारी, सदस्य व असंख्य हितचिंतक यांचे उदार सहकार्य आम्हास लाभले. त्या मुळेच या अलपकाळात ग्रामीण भागातही हे यश आम्ही मिळवू शकलो. प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थीजन यांच्या सहभागाने व सामंजस्यानेच हा प्रगतीचा लेख लिहिला गेला. 'शिवराज' च्या पुढील वाटचालीत सर्वांचे सततचे सहकार्य लाभेल व या महाविद्यालयाच्या प्रगतीचा आलेख उंचावला जाईल असा मला विश्वास वाटतो.

**प्राचार्य बलवंत देशमुख**

# श्रद्धांजली



"पराधीन आहे जगतीपुत्र मानवाचा"

साहित्य, कला, समाजकारण, राजकारण व इतर क्षेत्रातील खालील महनीय–व्यक्तींचे दुःखद निधन झाले, त्याना आमची भावपूर्ण श्रद्धांजली.

| | |
|---|---|
| थोर कामगार नेते व माजी राष्ट्रपती | – व्ही. व्ही. गिरी |
| युवक नेते | – संजय गांधी |
| ध्येयवादी साहित्यिक व आग्रही विचारवंत | – पु. भा. भावे |
| नट-सम्राट | – सतिश दुभाषी |
| विख्यात पार्श्वगायक | – महमंद रफी |
| महान कांदबरीकार | – र. वा. दिघे. |
| थोर कायदे-पंडीत, विचारवंत राजनीतिज्ञ न्यायमूर्ती | – एम. सी. छगला |
| आमच्या कॉलेजचा बी. ए. भाग तीन मधील विद्यार्थी | – पावलू बार्देस्कर |
| आमच्या कॉलेजची बी.ए.भाग तीन मधील विद्यार्थिनी | – जयश्री एकबोटे |
| शिवराजचे माजी प्राचार्य | – गोपाळराव उपलेकर |

-संपादक.

# शिवराज महाविद्यालय गव्हर्निंग कौन्सिल

| | | |
|---|---|---|
| १) | मा. खासदार बाळासाहेब माने | अध्यक्ष |
| २) | ,, डी. एस. कदम | उपाध्यक्ष |
| ३) | ,, बी. बी. देशमुख | सेक्रेटरी |
| ४) | ,, शंकरराव बाबूराव चव्हाण | सदस्य |
| ५) | ,, वाय. आर. मोहिते | ,, |
| ६) | ,, एन. जी. बटकडली | ,, |
| ७) | ,, व्ही. व्ही. फडणीस | ,, |
| ८) | ,, अॅड. एस. डी. शिंदे | ,, |
| ९) | ,, टी. आर. मोकाशी | ,, |
| १०) | ,, धोंडीराम पताडे | ,, |
| ११) | ,, गणपतराव तथा दादा देसाई | ,, |
| १२) | ,, कृष्णराव पाटील | ,, |
| १३) | ,, एस. टी. जाधव | ,, |
| १४) | ,, एन. आर. डुंडगेकर | ,, |
| १५) | ,, जे. ए. सबनीस | ,, |

# आमचा प्राध्यापक वर्ग.

### मराठी

प्राचार्य बी. बी. देशमुख
प्रा. व्ही. एस. बन्ने
प्रा. एम. एन. कोटीभास्कर

### हिंदी

प्रा. डॉ. ए. जी. गोकाककर
प्रा. सौ. एस. एम. जगताप

### इंग्रजी

प्रा. एन. आर. दुंडगेकर
प्रा. के. बी. केसरकर
प्रा. जी. जी. गुळवणी
प्रा. सौ. एस. ए. मुजुमदार

### अर्थशास्त्र

प्रा. एस टी. जाधव
प्रा. ए. ए. पोवार
प्रा. कु. एस. सी. फडके

### समाजशास्त्र

प्रा. व्ही. एन. गजेंद्रगडकर
प्रा. के. व्ही. कुराडे
प्रा. कु. एस. एस. जोशी

### राज्यशास्त्र

प्रा. सी. ई. धुमाळ

### मानसशास्त्र

प्रा. बी. के. सोरटे
प्रा. डी. व्ही. बिराजे

### वाणिज्य

प्रा. सी. एस. गवसणे
प्रा. एन. डी. खिचडी
प्रा. डी. के. दंडगे
प्रा. ए. एस. मुधोळे
प्रा. आर. एन हरगुडे
प्रा. व्ही. के. पाटील

प्रा. वाय. पी. कोले

## शारिरिक शिक्षण

प्रा. ए. एस. नाळे

## आमच्या कार्यालयातील व ग्रंथालयातील कर्मचारी

### सुपरिटेंडेंट

जे. ए. सबनीस

### ग्रंथपाल

टी. ए. पाटील

### कार्यालयातील कर्मचारी

व्ही. एम. गवळी
बी. एस. मोहिते
बी. डी. रेगडे
वाय. डी. पाटील
कु. पी. जी. चोथे
एम. एच. देसाई
ए. जी. कदम
एल. जी. गाडीवड्ड
बी. डी. मोरे


### शिपाई वर्ग

बी. आय. रामपूरे
एस. एस. गवळी
पी. के. जाधव
डी. एम. मोरे
बी. एस. सावंत
पी. जी. पोवार
एस. बी. मुसळे
एम. ए. कावणेकर
सी. एल. गोरुले

# मराठी विभाग

मानसापरी मानूस
राहतो रे येडजाना
अरे होतो छापीसनी
कोरा कागद शहाना

—बहीनाबाई चौधरी




# स्नेहसंमेलन

प्रमुख पाहुणे : उपकुलगुरु रा. कृ. कणबरकर व
अध्यक्ष : खासदार बाळासाहेब माने







# स्नेहसंमेलन










जनरल चॅंपियनशिप स्विकारताना बी. ए. भाग तीन-खेळाडू

ॲथलेटिक लेडीज चॅंपियन

प्राध्यापक वर्ग





ग्रंथालय – विभाग

२६ जानेवारी संचलन – पाहुणे डी. एस. कदम



# स्वातंत्र्योत्तर भारतीय स्त्री

सुभाष शेळके,
प्रथम वर्ष, साहित्य.

जग नि जीवन यांच्या लपंडावाच्या खेळात जीवन धावते बदलते आहे. या बदलातील आपण खरे घटक आहोत. एक काळ असा होता की या देशातील स्त्री चूल नि मूल या कार्याशिवाय उंबरठ्याबाहेर पडत नसे 'पण काळ चालला पुढे पुढे' या न्यायानुसार बदलत्या काळाबरोबरच स्त्री भोवती जो बंधनाचा पाश गुरफटलेला होता त्यातून स्त्री मुक्त झाली.

काळ्या कभिन्न मेघखंडाला रुपेरी कडा असतेच. दुसरे महायुद्ध झाले. नंतर १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. दुसऱ्या महायुद्धासारख्या भयानक अरिष्टातूनही जगात समता स्थापण्याचा प्रयत्न झाला. भारतातील आणि त्याच बरोबर सर्व जगातील स्त्रीवर्गाला समान नागरी हक्क मिळाले आणि ती न्यूनगंडातून मुक्त झाली. विशेष म्हणजे भारतासारख्या आपल्या देशात एक आवश्यकता म्हणून स्त्रीच्या मातृत्वाला मर्यादा घालण्यात आली.

स्त्रीचे स्वातंत्र्य म्हणजे अखिल मानव जातीचे स्वातंत्र्य होय म्हणून स्त्रीला खऱ्या अर्थाने स्वातंत्र्य मिळायचे असेल, समान हक्क प्राप्त व्हायचे असतील तर स्त्री सुसंस्कृत बनली पाहिजे याची जाण समाजसुधारकांना झाली. त्यामुळे शिक्षणाची सोय खेड्यापाड्यापर्यंत पोहचविण्यात आली. आणि त्या दृष्टीने अजूनही प्रयत्न सुरु आहेत. तरीसुद्धा भारतीय स्त्रीचे जीवन अजूनही असुरक्षित आहे, आणि महा–राष्ट्राच्या बाबतीत तर ते अधिकच आहे.

दवाखान्यातून उपलब्ध असलेली आकडेवारी पाहिली तर असे दिसून येते की बाळंतपणातील मृत्यूंची संख्या जास्त आहे. शिवाय अलिकडे स्त्रियांना पळवून नेणे किंवा त्यांच्यावर जबरदस्ती करणे, अत्याचार करणे, बलात्कार होणे हे स्वतंत्र भारतातील स्वतंत्र

स्त्रियांचे दुर्दैव होय. हजारो भगिनीना सक्तीने किंवा फूस लावून पळवून नेले जाते, त्या पैकी काहींची वर्दी पोलिसात दिली जाते. परंतु अशा अगदी थोड्याच जणींचा पत्ता लागतो संयुक्त राष्ट्राने स्त्रिया व मुली यांच्या अनैतिक व्यापारास बंदी घातलेली आहे. अशा या संघटनेचा भारत सभासद आहे. असे असतानाही स्त्रियांच्या बाबतीत वरील गोष्टी घडतात हे किती खेदास्पद आहे.

जातीतच लग्न करण्याची प्रथा अजूनही आपल्या देशात बऱ्याच प्रमाणात आस्तित्वात आहे. विवाह व कुटुंब अशा सामाजिक संस्थांशी स्त्रिया अजूनही निगडीत आहेत. पण अलिकडे यामध्ये कांही प्रमाणात बदल घडून येत आहे, परिवर्तन होत आहे आंतरजातीय विवाह प्रेमविवाह यांचे प्रस्थ कांही प्रमाणात का होईना वाढत असल्याचे दिसून येते. जरठ-कुमारी विवाह, बाल विवाह यासारखे कायदे करण्यात आले पण तरीसुद्धा भारतातील सरासरी २० मुलींची लग्ने १४ ते १५ व्या वर्षी झालेली आहेत. महाराष्ट्रात हे प्रमाण सरासरी १८ म्हणजे सरासरीपेक्षा २ ने कमी आहे.

खेड्यातील आणि शहरातील मुलींच्या विवाहाची असलेली परिस्थिती कांहीशी चमत्कारीक आहे. ग्रामिण विभागातील मातापित्यांना आपल्या कन्येचा विवाह ती वयात येण्यापूर्वीच उरकून टाकावा असे वाटते. शहराच्या बाबतीत ही स्थिती जरा वेगळी आहे शहरातील मुली या सामान्यतः सुशिक्षीत असतात आणि या सुशिक्षित वर्गातील मुलीना 'सावधान' ऐकण्याची वेळ येणे ही सोपी गोष्ट राहिलेली नाही कारण जात, हुंडा, दर्जा यासारखी भयंकर विघ्ने आ वासून उभी आहेत. परिणामतः सुशिक्षीत मुलींचे विवाहाचे वयोमान जवळ जवळ २३ ते २४ इतके वाढले आहे त्यामुळे नैसर्गिक वृत्तींना वाव देण्यास कांहीजणी अनैतिक मार्गाचा अवलंब करताना दिसतात.

स्वातंत्र्यानंतर औद्योगिक क्रांतीस सुरवात झाली या औद्योगिकरणाचा खोलवर परिणाम झाला तो कुटुंबसंस्थेवर, संयुक्त, अथवा एकत्र कुटुंबातून विभक्त कुटुंब उदयाला आले. कुटुंबातील सदस्यसंख्या आपोआपच मर्यादित झाली. त्यामुळे स्त्रीच्या स्थानात परिवर्तन घडून आले. कांही अंशाने स्त्री स्वयंनिर्णय घेवू लागली. कुटुंबातील स्त्रीचे स्थान आपोआपच उंचावले गेले.

" उतरंडीला नसावी केळी,
घरात नसावी नणंद खेळी "
" सासूची झाली होळी,
सून वाजवे टाळी. "

वरील म्हणीतून व्यक्त केलेले सासू–सून, नणंद, भावजय यातिल संबंधाचे वर्णन दिसून येते त्यामध्येही आता परिवर्तन घडून आले आहे. पूर्वी सासूचा उल्लेख करताना सून 'सासूबाई' असा करी, तर आता ती सासूबाईला 'आई' म्हणू लागली आहे. तर सासू सुनेला 'सूनबाई' म्हणण्याऐवजी नावाने बोलवू लागली आहे.

स्वातंत्र्यपूर्व कालात शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या अत्यल्प होती. पण स्त्री शिक्षणाच्या प्रसारामुळे आणि प्रचारामुळे शालेय आणि उच्च शिक्षण घेणाऱ्या मुलींची संख्या वेगाने वाढली आहे. पण त्या त्या वयोमान गटातील संख्येशी तुलना केली तर ही वाढ कमी आहे. शिवाय विविध पातळीवरील मुलांच्या मानाने मुलींची संख्या कमीच आहे.

स्त्रियांच्या दृष्टीने शिक्षकाचा पेशा हा अर्थार्जनाचा योग्य मार्ग आहे. विशेषतः बालवाडी व प्राथमिक शाळेत मानसशास्त्राच्या दृष्टीने स्त्रियांच अध्यापनाचे काम यशस्वी करू शकतील. सध्या शिक्षकाची टंचाई असूनही शेंकडा ३०% स्त्रियाच शिक्षक म्हणून काम करताना दिसतात. डॉक्टरी व्यवसायाची पदवीही स्त्रियांनी मिळवली आहे. ज्ञानसंपादनाच्या चुरशीत मुलीही आघाडीवर आहेत. असे असले तरी त्यांचा कल प्रामुख्याने साहित्य शाखेकडेच आहे. १९६१ च्या अहवालानुसार ४०% स्त्रिया अर्थार्जन करतात तर ६०% स्त्रिया अर्थार्जन करीत नाहीत

स्वातंत्र्योत्तर स्त्री आपल्या संघटनाद्वारा समाजकल्याणासाठी जागतीक रंगमंचावरही आपल्या परीने प्रयत्न करीत आहे. अशा चळवळीत व राजकीय भूमीकेतही भारतीय स्त्री इतर पुढारलेल्या राष्ट्रांच्या

मानाने मागेच आहे.

भारतीय स्त्रीने बरीच प्रगती केली असली तरी ती आपल्या आयुष्यात धरसोडीने वागते आहे. एक निश्चित भूमिका ती घेत नाही. वेदपूर्व कालात स्त्रीला पुरुषाइतकेच अधिकार मिळाले होते. गार्गी सारख्या स्त्रिया राजदरबारी बसून अनेक विषयावर चर्चा करीत असत. पण मधल्या काळात स्त्रियांनी आपले स्वातंत्र्य हरविले. समाजाने त्यांना अनेक बंधनात बांधून टाकले स्त्रीच्या व्यक्तीत्वाचा कोंडमारा केला या बंधनाना झुगारुन परत स्त्रियांना स्वातंत्र्य व समान हक्क मिळण्यासाठी संघटना उभ्या कराव्या लागल्या. आपल्याला स्वातंत्र्य, अधिकार मिळावेत यासाठी स्त्रियांनी आवाज उठविला आणि स्वतंत्र भारताचा एक स्वतंत्र नागरिक म्हणून स्त्रीला समान अधिकार मिळाले. पण स्वातंत्र्यानंतर मात्र स्त्री पुन्हा पारतंत्र्याकडे झुकलेली आहे. ती आपले स्वातंत्र्य कुणाला बहाल करु लागली आहे. त्यामुळे साहजिकच असा प्रश्न निर्माण होतो की खऱ्या अर्थाने स्वतंत्र मानव म्हणून स्त्रीला समानतेचे स्थान मिळाले आहे का ? की अजूनही भारतीय स्त्रीच्या मनातील न्यूनगंड कायम आहे ? तात्विक दृष्टया उत्तर 'होय' असेच द्यावे लागते. पण या आदर्शांपासून ती अजूनही दूर आहे. अशा स्त्रियांचे प्रमाण भारतात सर्वाधिक आहे आणि त्यातही मध्यम आणि कनिष्ठ दर्जाच्या समाजात तर ते अधिकच आहे.

नोकरी करणाऱ्या दोन स्त्रियांमधील संभाषणावरुन स्त्रीच्या स्थानाची कल्पना येईल.

पहिली– " मी माझा पगार किनई यांच्या स्वाधिन करते आणि मला ते पॉकेट मनी देतात "
दुसरी– " मला खर्चाला लागणारे पैसे ते देतात "

यावरुन स्त्री ही अर्थार्जन करीत असली तरी घरच्या खजिन्याची ती सहमालकीन नाही. वस्तुस्थिती आणि आदर्शवाद यातील बरेच अतंर तिला तोडावयाचे आहे. स्त्रीही मातृत्व घेवून जन्माला आली आहे. आणि त्याच मातृत्वाच्या विशाल भावनेतून मानवजात घडविणार आहे. स्त्रीने राष्ट्राच्या विधायक प्रगतीला हातभार लावला पाहिजे. एक स्त्री नव्हे तर एक मानव म्हणून ते तिचे कर्तव्य आहे. त्यादृष्टीने तिचे स्थान उंचावत आहे हे सुचिन्हच होय.

O O O

# ' नि य ती '

काळोख्या रात्रीचा गार वारा अंगाला झोंबत होता. काजव्यांचा कीरऽऽ असा आवाज ऐकू येत होता. मोगरीचा सुवास सर्वत्र पसरला होता. शांत-अशांत अशा वातावरणात ती निश्चल अशी उभी असतानाच, पाठी-मागे कुणाची तरी चाहूल लागली. मागे वळून पाहिलं तर उजेडापासून अंधाराकडे एक सावली – – – – पुढे – – पुढे – – येत अंधारात लोपून जात होती. पावलांच्या आवाजावरुन येणाऱ्याच आगमन कळत होत – – – – पण – – – तरी ती तशीच उभी होती.

" काश्मिरा, अग कोण आलय ते पाहिलस का ? "

" दादा. अरे सांगितल्या शिवाय कसं – – – – – – – कळणार – – – ? "

काश्मिरनं आपल बोलणं अर्धच सोडलं – – – तिचं लक्ष समोर गेलं आणि ती गप्प उभी राहीली. समोर तिचा भावी पती अनीत उभा होता. तिने आपली नजर त्याच्या नजरेला मिळवली आणि लाजून खाली पाहू लागली.

" पाहिलस ना कोण आलय ते ? आता स्वारी खुष ! – – – अरे अनीत बसना. बोला तुम्ही. मी येतोच "

त्या दोघांना एकांतात बोलायला मिळाव म्हणून अभय खाली जावू लागला – – – तसा अनीत म्हणाला ,' अरे तू का खाली चाललास ? थांबना ! काश्मिरा बोलायची नाही, शिवाय कांही खाजगी नाही. "

" बर बोल तर मग. काय काम होतं ? "

" मी माझ्याबरोबर काश्मिराला शॉपिंगला न्यायचं म्हणत होतो. आप्पांची परवानगी काढली आहे, पण काश्मिरा तयार – – – आहे. – – – "

कु. नंदिनी जयवंत सबनीस,
तृतीय वर्ष साहित्य.

" अरे अनीता. आप्पानी तुला परवानगी दिली आहे. मग तिला काय विचारतोस – – – असं सतत विचारु लागलास नं – – – तर ती तुझ्या डोक्यावर बसेल हं. आणि – – एक माझी ही परवानगी आहे हं. पण तू न मागता मी तुला दिलीय " – – – " काय ग – – – मग जाणार ना अनीत बरोबर – – ? "

काशिमरा लाजून उभी होती तिची साजरी मूर्ती अनीत आपल्या हृदयात साठवत होता. किती तरी वेळ अभय अनीतच्या गप्पा चालल्या होत्या. काशिमराही मधून मधून भाग घेत होती. – – – मधूनच घड्याळ-कडे पाहून अनीत उठला. दोघे भाऊ-बहीण त्याला गेट पर्यंत पोहचवून परतले.

दुसऱ्या दिवशी ब्रेकफास्ट तयार करताना अनी–तने अभयला मारलेली हाक तिने ऐकली दोघे गप्पा मारु लागले.

" काय अनीत, मला नेणार आहेस का ? अरे तू काशिमराला नेणार आणि हाकमात्र मला मारणार – – – !.

" अभय अप्पा आहेत ना. त्यांच्या समोर मी तिला कशी हाक मारु – – – "

दोघांच्या अशा गप्पा चालल्या असताना आप्पा आले. अनीतने त्याना नमस्कार केला.

ब्रेकफास्ट नंतर काशिमरा तयार झाली देवाला आप्पनां आणि अभयला नमस्कार करुन ती अनित बरोबर निघाली.

किती तरी वेळ आप्पा आणि अभय दोघे उभे होते. काशिमरा वाचून सार घर सुनं – – वाटत होत. आता नुसती फिरायला गेली तर घर सुनं झाल होत – – – – मग लग्नानंतर काय ? – – – या विचाराने त्यांचे डोळे पाण्यांनी भरले – – – – काशिमरा लहान असतानाच तिची आई वारली. आप्पानी तिला लाडात वाढवल होतं. अभय-अप्पांच्या मायेच्या उबेत ती वाढली. हसत – – – बागडत ती मोठी झाली होती. अठरा वर्ष कशी संपली ते दोघानाही कळत नव्हत.

काशिमरा दिसायला स्वरूपा, वागायला शालीन आणि हुषार होती – – ती आपल्या जवळ असावी म्हणून गावातल एक स्थळ पाहिल होत. अभयला देखील तिच्या बद्दल प्रेम होतं. तो तिला खूप जपायचा – – – तसा काशिमरालाही त्याच्या बद्दल आदर होता ती आपल्या दादाचा एकही शब्द खाली पडू द्यायची नही. त्याची पसंती तिला आवडायची. त्याला जे पसंत ते – – – ते तिला पसंत. ती दोघ भावंडं अशी होती, अगदी जगावेगळी.

अप्पा आणि अभयनी अनीतला पसंत केल होतं. आणि तो होता ही तसाच – – – काशिमराला शोभेसा तिला जपणारा आणि शिवाय गावातलाच. अनीतला प्रथमच काशिमरा आवडली होती. तिच्या चोरट्या नजरेला अनीतने आपल्या नजरेने सम्मती दिली होती. काशिमराही आनंदली होती – – – अनुरुप पती लाभला. – – – – शिवाय अप्पा आणि अभयदादा पासून तिला दूर जावे लागणार नव्हते. त्यांच्या नजरे समोरच तिचा संसार फुलणार होता. अनीत सर्वांना आवडला होता. त्याला कसलीच प्रौढी नव्हती तो मन-मोकळे करुन बोलायचा. अप्पांच्या बरोबर विनयाने वागायचा. अप्पाना मनाजोगा आणि शिवाय गावा–तलाच जावयी मिळाला आणि अभयला त्याचा दोस्त.

तसेच दोघे विचार करत उभे होते. दोघेही आनंदात होते. अभयने अप्पांना त्यांच्या खोलीत नेले. सुख आपल्या दोन्ही हातानी दान देण्यास उभे होते – – – – पण ते दान घ्यायला हात मात्र अपुरे पडत होते.

" अभय, तू ही लग्न कर. एक मुलगी चालली आहे तिची जागा घ्यायला कुणी हवचं – – तेव्हा – –

" अप्पा इतकी घाई कशाला ? काशिमराचं आधी होवू दे. पुढे पाहू.

" माझ्या डोळ्यासमोर व्हाव अस वाटतय. मी

आज आहे – – – उद्याच काय – – – ?

त्यांच्या ओठावर आपले हात ठेवून अभय म्हणाला. " आप्पा, का अस बोलताय अजून सार पहायचंय – – – अनुभवायचंय. मग अस अशुभ – – – – का ? "

" अभय, मरण कुणाला टळलं आहे का ? कधी तरी मरायचं ना ? अरे. तेच जगातलं सत्य आहे. मला सारं काही मिळालंय. आता फक्त सून पाहू दे – – – तुझ सुख बघू दे बस्स् – – – आणखी काही नको. "

" ठिक आहे आप्पा. तुमच्या मनासारख होईल. असं म्हणून अभय बाहेर गेला. त्याने गड्याच्या हातातले कॉफीचे कप घेतले आणि पुन्हा तो खोलीत गेला. कॉफीचा एक कप त्याने आप्पाना दिला आणि दुसरा कप स्वतः घेणार इतक्यात फोनची घंटी वाजली. हातातला कॉफीचा कप ठेवून अभय फोन जवळ गेला आणि 'हॅलो' म्हणून त्याने फोनवर विचारणा केली. फोनवरच बोलणं ऐकून तो मती खुंटल्यासारखा उभा राहीला. फोन बंद केला. तेवढ्यात – – – –

" कायरे अभय, काय झाल ? तू असा का उभा आहेस ? आत्ता कुणाचा फोनआला होता ? "

" आप्पा – – फोन – – दवाखान्यातून आला होता – – – अनीतच्या कारला अॅक्सीडेंट झालाय. दोघेही सिरीयस आहेत. आता दवाखान्यात जायला हव – – – – – "

" काय रे देवा, हे काय झाल ? काश्मिरा माझ्यापासून दूर-सासरी – – जाणार म्हणून मी दुःखी होतो – – पण – – हे काय ? अप्पांवर एकदम आघात झाला. त्या आघातामुळे – – – पुढे एक शब्द ते बोलू शकले नाहीत. ते बेशुद्ध झाले. अभयने गड्याकडे जावून – – त्याला आप्पांकडे लक्ष द्यायला सांगितले. आणि तो दवाखान्याकडे गेला.

कॉटवर अनीत-काश्मिराला झोपवले होते. दोघांच्याही श्रांत-निष्पाप चेहऱ्याकडे बघताना डोळ्यातून अश्रू ओघळले. अश्रू पुसून त्यांनी हाक मारली दोघानी डोळे उघडून अभयकडे पाहिले काश्मिरा म्हणाली. – " अता आप्पांना आधार दे – – – दादा – – – तू अश्रू – – – – " तिला नीट बोलताही येत नव्हते. अनीत–काश्मिराकडे पहाताना अभयच्या डोळ्यातून अश्रूंच्या धारा वाहत होत्या. दोघांच्या चेहऱ्यावर क्षणभर हास्य दिसले – आणि दुसऱ्या क्षणाला ते हास्य नाहीसं झाल. आता पर्यंतचा आवरलेला उमाळा त्यांच्या हुंदक्यातून बाहेर पडत होता. किती तरी वेळ तो तसाच बसला होता अचानक तो भानावर आला आणि घराकडे निघाला.

घरी सर्व शेजारी गोळा झाले होते. अभयचा आधारवृक्षच उन्मळून पडला होता. कलीकेच अकालीच कोमेजण – – – तो सहन करु शकला नाही. अभय आता एकाकी होता. डोळ्यातून अश्रू वहात होते – – पण ते पुसायला कुणीच नव्हते. नियतीने आपला खेळ पूरा केला होता. – – – अभय नियतीचा खेळ पहात मूकपणे अश्रू गाळीत होता –.

● ● ●

" ज्याना विचार करण्याची पात्रता नसते त्यांचे खरे सुख
केवळ करमणुकीत भरलेले असते " — पोप.

" एखाद्याला पाहताच आपल्या मनावर जो पहिला संस्कार
होतो त्याला फार महत्व आहे. " -- कॉनग्रेव्ह

# जीवनावश्यक वस्तूंची टंचाई

## कारणे व उपाय

सी. वाय. पाटील
तृतीय वर्ष, वाणिज्य.

सद्या भारतात भाववाढीबाबत व ती कशी रोखता येईल या संदर्भात चर्चा चालू आहे. या समस्येबाबत सामान्य व्यक्तीच्या मनात अनेक गैरसमज आढळतात, पण तज्ञ व्यक्तीही गोंधळताना आढळतात. ही समस्या फारच गुंतागुंतीची आहे हे मान्य आहे. तरीही या सबंधातील काही सर्वसामान्य कल्पनांचा येथे थोडक्यात विचार करण्याचे मी योजले आहे.

भाववाढ ज्याला इंग्रजीत Inflation व मराठीत चलनवृद्धी असे म्हणण्यात येते – म्हणजे नक्की काय ? जर वस्तूंच्या व सेवांच्या किंमती फार वेगाने व मोठ्या प्रमाणात वाढल्या तर त्याला सर्वसाधारणपणे भाववाढ म्हणतात. जीवनावश्यक वस्तूंच्या बाबतीतही वस्तूंची टंचाई निर्माण होणे व त्यामुळे वस्तूंच्या किंमती वाढणे यामुळेच भाववाढ होते. भाववाढ व चलनवाढ हे अर्थव्यवस्था कुडतरणारे दोन भयानक रोग आहेत. सर्वसाधारणपणे ज्यावर्षी जीवनावश्यक वस्तूंच्या किंमती सामान्य पातळीवर असतात ते वर्ष आधारभूत धरूण त्या प्रमाणात इतर वर्षी त्या किंमती किती प्रमाणात वाढल्या हे ठरविले जाते, सर्वसाधारणपणे १९७०–७१ हे वर्ष आधारभूत धरले तर १९७९–८० या वर्षात किंमत दुप्पट व अडीचपट वाढलेल्या आहेत. उत्पन्न कमी आणि खर्चात वाढ म्हणजे वाढत्या किंमतीला निमंत्रणच या बरोबरच व्यापारी वर्ग आपल्या स्वार्थी कारखान्यानी ही परिस्थिती तीव्र करतात व वाढलेल्या किंमती आणखी वाढवितात. म्हणूनच किंमती कमी करा अन्यथा कडक कारवाई करु असा प्रकारचा इशारा प्रंतप्रधानानी व्यापारी वर्गाला दिला आहे.

वास्तविक किंमती वाढणे व जीवनावश्यक वस्तूंची टंचाई होणे हा प्रश्न सर्वसंबंधितांचा आहे. शासनाची चुकीची आर्थिक धोरणे आणि आर्थिक व्यवहारात कोणत्याही प्रकारची शिस्त नसणे या गोष्टी सुद्धा भाव–

वाढीला व जीवनावश्यक वस्तू टंचाईला कारणीभूत आहेत. सरकारचा अनुत्पादक खर्च आणि तुटीचे अर्थ–संकल्प ही तर भाववाढीचे खरी कारणे आहेतच. याखेरीज हजारो अनुत्पादक सल्लागार समित्या व त्यावर होणारा खर्च हा भाग निश्चितपणे टाळता येणे शक्य आहे. राजकीय कारणासाठी ज्यावेळी अर्थ–कारण राबविण्यात येते त्यावेळी निश्चितपण भाववाढ होणे अपरिहार्य ठरते. माजी केंद्रिय रेल्वे मंत्री मा. मधु दंडवते यानी रेल्वे विभागाच्या अनुत्पादक समीत्या या कारणासाठीच रद्द केल्या होत्या.

एकंदरीत वाढता पतपुरवठा, तुटपुंजे उत्पादक, आवश्यक वस्तूंची निर्यात, वाढता सरकारी खर्च, मुद्रा विषयी चुकीची धोरणे व्यापारी वर्गाने घेतलेला टंचाई-चा गैरफायदा, आंतरराज्य व्यापारबंदी या सर्व कारणामुळे सद्याची भाववाढ निर्माण झाली आहे. वाढत्या किंमतीचा प्रश्न नवीन केंद्रिय शासनासमोर उभा आहे. तसे पाहिलेतर स्वातंत्र्योत्तर काळात देशात हा आर्थिक पेचप्रबंग कायम स्वरुपाचाच उभा आहे. तसे पाहिले तर स्वातंत्र्योत्तर काळात देशात हा आर्थिक पेचप्रसंग कायम स्वरुपाचाच उभा ठाकल्याचे आढळते. प्रत्येक योजनेच्यावेळी व प्रत्येक निवडणु–कीच्या वेळी किंमती स्थिर राहतील. असा अंदाज कर-ण्यात आला होता परंतु पहिल्या योजनेपासून किंमती वाढू लागल्या व त्या कायमच्या वाढत गेल्या.

देशातील वाढत्या किंमतीची व जीवनावश्यक वस्तूंच्या टंचाईची कारणे व स्वरूप समजावून घेतल्या-नंतर या किंमती कशा प्रकारे कमी करता येतील हा महत्वाचा प्रश्न आहे व्यापारी वर्गाने स्वच्छेने किंमती कमी कराव्यात या पंतप्रधानांच्या आवाहनाला प्रति–साद मिळालेला दिसत नाही. याचाच अर्थ असा की केवळ सदिच्छेच्या भावनेतून हा प्रश्न सुटणार नाही. या करिता निश्चित प्रकारची उपाययोजना हमी. किंमती कमी करण्या करिता दोन प्रकाराचे धोरण निश्चित करावे लागेल.

एक ' त्वरीत कार्यवाहीचे ' आणि दुसरे ' दिर्घ मुदतीचे. यामध्ये १) राज्य, केंद्र सरकारच्या अनुत्पादक खर्चाला कात्री घटनात्मक तरतुदीने लावता येते उदा.– छोटया गाडया, छोटी घरे, नेहमीच्या व्यापारी कंपनीच्या विमानातून प्रवास, अनुत्पादक सल्लागार समित्या रद्द करणे, खाजगी कामासाठी वाहनांचा उपयोग, मंत्र्यांच्या संख्येवर निश्चित बंधन इत्यादी गोष्टी होणे आवश्यक आहे. राजकारणाकरिता मंत्री–मंडळात वाढ करुन अनुत्पादक खर्च भरमसाठ वाढून इतर उत्पादक कार्याकरिता पैसा उपलब्ध होत नाही.

२) मालाची सक्तीची वसुली– ज्याप्रमाणात शेतकऱ्या-कडून सक्तीने धान्याची वसुली केली जाते व ते धान्य शिधा वाटप दुकानातून वितरित केले जाते, त्याचप्रमा-णे जीवनोपयोगी वस्तूंच्या उत्पादकांकडून वस्तुंची सक्तीची वसूली करण्यात यावी. अशा एकत्रित केलेल्या वस्तू रेशन कार्डधारकाना त्यांच्या युनिटप्रमाणात वाटप करण्यात याव्यात म्हणजे त्या वाजवी किंमतीत ग्राहकांना मिळू शकतील उदा. – गोडे तेल, वनस्पती तूप, कापड डाळी, इंधन, अन्नपदार्थ इ.

३) धाऊक व्यापाऱ्यांवर छापे– वसुलीकरिता शेतकऱ्यां-च्या घरावर विषेशतः ग्रामीण भागात महसूल अधि–कारी छापे टाकतात व अतिरिक्त धान्याची वसुली केली जाते. परंतु दुर्दैवाने अशा प्रकाराचे छापे मोठया व लहान शहरातील घाऊक व्यापाऱ्यांच्या गुदामावर टाकले जात नाहीत. साठेबाजी व कृत्रिम टंचाईला आळा घालण्यासाठी अशा प्रकारचे छापे देशभर टाकण्यात यावेत व मिळालेल्या वस्तूंचे वाटप यंत्रणेमार्फत कर–ण्यात यावे. या उपायामुळे तावडतोब वस्तूंची उपल–ब्धता व कृत्रिम टंचाईला आळा या दोन गोष्टी शक्य होतील.

३) ग्राहकोपयोगी मालाची निर्यात नको– जीवनो–पयोगी वस्तूंची निर्यात त्वरीत थांबवणे हा सुद्धा उपाय टंचाई कमी करण्याकरिता होदू शकतो. देशातील जन-तेला उपाशी ठेवून परदेशात वस्तू पाठवणे हे धोरण आपल्या देशाला परवडणार नाही. गेल्या काही वर्षात रशिया व इतर कांही राष्ट्रांना कमी किंमतीत शेंगदाणा तांदुळ, व अन्य वस्तू पाठविण्यात आल्या. त्याचबरोबर जीवनोपयोगी वस्तूंचे उत्पादन करणाऱ्या उत्पादकावर काही जाचक नियंत्रणे असतील तर ती कमी करण्यात यावीत.

दिर्घकालीन उपाय – याचबरोबर काही दीर्घकालीन उपाय योजणे आवश्यक आहे. उदा.– बँकांचे पतपुरवठा नियोजन, गरजेप्रमाणे पतपुरवठा, साठेबाजीला आळा, बँकांकडून मिळणाऱ्या कर्जाची कसून तपासणी व फेर आखणी करणे इत्यादी गोष्टी करणे आवश्यक आहे. त्याचप्रमाणे गांधीवादी अर्थव्यवस्था निर्माण करणे आजच्या काळात आवश्यक आहे. त्याचप्रमाणे अन्न–धान्याचीच नव्हे, तर इतर आद्यौगिक वस्तूंची चोरटी आयात निर्यात थांबवण्याकरिता कडक उपाय योजना करावी लागेल. त्याचप्रमाणे नाणेपुरवठा कमी करून राष्ट्रीय उत्पन्नामध्ये वाढ केली पाहिजे.

यासाठी नागरीकांनीही जीवनावश्यक वस्तूंची टंचाई व भाववाढ टाळण्यासाठी साठेबाजीची प्रवृती निकालात काढली पाहिजे म्हणजे गरजे इतक्याच वस्तूंची खरेदी करणे हे होय.

○ ○ ○


एस् एस् दड्डी, " दड्डी ऑइल मिलस् "
गडहिंग्लज यांचेकडून –

गरीब विद्यार्थी सहाय्य निधी म्हणून
३२५ रुपये मिळाले.

– शिवराजतर्फे धन्यवाद –

# ' जीवन लेणी '

**राजाराम पाटील**
तृतीय वर्ष, वाणिज्य.

जीवनाचे बहुतेक क्षण हे पाऱ्याप्रमाणे निसटणारे ओघळणारे असतात. त्या क्षणांचे ठसे म्हणून उटत नाहीत. ह्या उलट काही क्षण असे असतात की ज्यांचा ठसा त्यांच्या पश्चात् कायमचा आपल्या मनावर उमटून राहतो. हे मोजकेच क्षण जीवनाचा काही वेगळाच आशय सांगतात. अेरव्हीचे निरर्थक, सामान्य व व्यावहारिक जीवन त्यावेळी साक्षात्कारी व चैतन्यमय होऊन जाते. जीवनाची लेणी अशा अमर क्षणांच्या स्मृतीने क्षणभर का होईना पण झळाळून निघतात. या क्षणांची स्मृति घेऊनच भावी काळ आपण घालवत असतो.

ज्युनिअर कॉलेजच्या वर्गात शिकत असताना आमची सहल रायगड, महाबळेश्वर, प्रतापगड इ. प्रदेश पहाण्यासाठी गेली होती. रायगडच्या ऐतिहासिक महत्वाचे, शिवरायांच्या वास्तव्याने पावन झालेल्या सर्वच किल्याचे व प्रदेशाचे आपणास आता प्रत्यक्ष दर्शन घेता येणार म्हणून मी आनंदीत झालो होतो. तरीही मनाला थोडी शंका वाटत होती की आपण आतापर्यंत देवालयातील मूर्तीला श्रद्धामय अंतःकरणाने नमस्कार करु शकलो नाही. मनामध्ये विशिष्ट हेतू ठेवून देवाला नवस करणाऱ्या देवाच्या भक्तगनांकडे व देवाची पूजा करणाऱ्या आणि स्वतःची आर्थिक प्राप्ती करून घेणाऱ्या पुजाऱ्याकडे पाहीले म्हणजे माझे मनाचे पावित्र्य संपुष्टात येते. म्हणून मला मनात वाटत होते की आपण शिवरायांच्या पवित्र ठिकाणी जावून त्यांच्या बाबत अंतःकरणपुर्वक मनात आदर ठेवू शकेन की नाही.

अशी मनाची एकीकडे बैचेन अवस्था असतानाच आम्ही सर्व विद्यार्थी व विद्यार्थिनी एस. टी. बसमधून रायगडचा प्रवास करीत होतो. आम्ही सर्वच मुले

आपल्या महाराष्ट्राची एकेकाळी असलेली राजधानी पाहण्यास उत्सुक होतो. प्रवासात बरेच मोठे चढउतार दऱ्याखोरी, पर्वतरांगा व नदीनाले असा सर्वच प्रदेश, पाहून खरोखरच आपण शिवकाळात जात आहोत असा भास होत होता. मनाच्या एका कप्यात शिवरायांची थोर माता, त्यांचा तेथे झालेला राज्याभिषेक सोहळा, त्यांचे एकनिष्ठ सवंगडी, मंत्रिमंडळ, शिवरायांचे एकंदर कर्तृत्वच मनःपटलावरून एकामागोमाग एक असे जात होते. सभोवतालचा सर्वच प्रदेश अतिशय रमणीय आल्हाददायक वाटत होता. एस. टी. मध्ये सर्वच वातावरण आनंदाने फुलले होते. टेपरेकॉर्डवर हिंदी चित्रपटातील तरुण मनाला धुंद करणारी भावमधुर गाणी मुले ऐकत होती. काही मुले मुली गाण्यांच्या तालात नाचून आनंदात भर घालत होती महाराष्ट्रातील इतर अनेक ठिकाणहूनही बरीच मंडळी रायगड दर्शनासाठी आलेली दिसत होती.

काही वेळातच रायगडची भक्कम तटबंदी दिसू लागली. तेव्हा मुलांचे मन उत्साहाने भरून आले. गडाच्या पायथ्याकडे गाडी जाताना अधून मधून मोर लांडोरी यांचीही नजरभेट सभोवतालच्या जंगलातून होत होती. अखेर आमची बस गडाच्या पायथ्याशी आली. सर्व विद्यार्थी, विद्यार्थिनी व सरांनी गडाच्या पायऱ्या चढण्यास सुरवात केली. वर चढण्यास दीड एक हजार पायऱ्या वरवर चढत्या प्रमाणात असल्याने प्रथमतः ही गोष्ट जमणे अवघड वाटत होते. पण उत्साहाने सर्वजण जवळजवळ धावतच गडाच्या पायऱ्या चढत होते अनेक अबालवृद्धही तरुणांना लाजवावे अशा उत्साहाने प्रेरित होऊन भरभर चढताना व गड उतरताना दिसत होते. अखेर आम्ही सर्वजण गडाच्या मुख्य दरवाजाशी येऊन पोहोचलो. गडाच्या प्रशस्त प्रवेशद्वारातून गडाची माची व विशाल बुरूज पाहून आम्ही नतमस्तक झालो. किल्ल्यावरील प्रत्येक मातीचा कण शिवकालाची आठवण करून देत होता. सभोवार दिसणारी किल्ल्याची मजबूत तटबंदी, उंच व उंच बुरूज, अनेक जुन्या इमारती, देवालय व शिल्पे पाहून मन भारावून जात होते. काही वेळातच शिवरायांच्या सिंहासनारुढ पुतळ्याचे दर्शन झाले त्यांच्या चेहऱ्यावर भव्यपणा, करारीपणा व उदात्तता अशा सर्वच गुणांचे भाव दिसून येत होते. त्यांच्या मूर्तीसमोर वंदन करण्यासाठी माझे हात आदराने जोडले गेले. पुढे जाऊन आम्ही शिवरायांचा एकेकाळचा दरबार पाहिला. आज तो मोडकळलेल्या स्थितीत आहे. परंतु तेथे उभे राहिल्यावर माझ्या डोळ्यासमोर राजांचा अविस्मरणीय राज्याभिषेक सोहळा साकार झाला. सर्वच मुले व सर तो भाग गंभीरपणे व एकाग्रतेने पहात होते. पुढे आम्ही राजांच्या महालाचे दर्शन घेतले, तेथूनच शिवरायांनी आपला पुत्र संभाजी राजे यांना राष्ट्रनिष्ठेचा व सद्वर्तनाचा मोलाचा उपदेश केला पण अखेर शिवरायांना आपल्या पुत्रासाठीच तेथे अश्रू ढाळावे लागले. बाजूस असलेला तोफखान्याचा परिसर पाहिला. किल्ल्याच्या सभोवारच्या सर्व प्रदेशावर देखरेख व शत्रूची टेहळणी करण्यासाठी मजबूत तटबंदीमध्येच अनेक लहानमोठी प्रमाणबद्ध छिद्रे ठेवण्यात आल्याची दिसत होती. शत्रूकडून होणारा मारा थोपवून धरता यावा म्हणून अशा ठिकाणी बुरूज व माच्यांची मजबूत व अवघड बांधणी केलेली दिसत होती. शिवरायांच्या काळापासून अनेकवेळा शत्रूनी रायगडावर हल्ला करुन जिंकण्याचा प्रयत्न केला. पण रायगड आपल्या अद्वितीय राजांच्या पराक्रमाची साक्ष ठेवून नेहमीच अजिंक्य राहिला आहे. त्याने अनेक शत्रूना भुईसपाट करुन पळवून लावले आहे. या सर्वांची साक्ष आजही कणखर व अतिशय मजबूत दिसणाऱ्या किल्ल्याच्या तटबंदी व उंचच उंच दिसणारी अवघड कडे यातून दिसून येते. आम्ही महालाचे दर्शन घेतले, तेथून शिवरायांच्या समाधीचे दर्शन घेण्यासाठी सर्वजण गेलो. " येथेच ते तेजस्वी व्यक्तीमत्त्व विलीन पावले " सर्वांचीच मने समाधीचे दर्शन होताच दुःखाने भरुन आली. मनात आत कोठेतरी फारच कालवाकालव झाली. शिवरायांच्या, आपल्या महाराष्ट्राच्या लाडक्या राजाच्या मृत्यूने त्यावेळची जनता किती शोक सागरात बुडाली असेल ! राजांच्या समाधीजवळच त्यांच्या इमानी ' वाघ्या ' कुत्र्याची समाधी आहे त्याच्या आत्यंतिक स्वामिभक्तीचे ते प्रतीक आहे बिचारे ते मुके जनावर पण आपला प्रिय धनी आपणांस सोडून जात आहे. हे समजल्यावर होणारे दुःख असावर होऊन तोही राजांच्या चिताग्नीमध्ये उडी मारुन विलीन झाला. जवळच राजांचा अश्वारूढ पुतळा आहे. गडावर अनेक ठिकाणी आम्ही सर्वांनी आपले व तेथील भागांचे फोटो

काढून घेतले होते. पण अधिक उत्साहाने व आनंदाने शिवरायांच्या पुतळ्याशेजारी आम्ही अनेक ग्रुप फोटो काढून घेतले. शिवरायांची ती स्वराज्य रक्षणासाठी रणांगणाकडे सुसाट वेगाने जात असतानाची घोड्याव-रील मूर्ती पाहून शरीर शौर्यभावनेनें संचारले गेले. प्र-खर स्वराज्यप्रेम, दूरदृष्टी, गंभीरपणा व सदैव पराक्र-माची साथ त्यांच्या अश्वारूढ पुतळ्याकडे पाहिल्यावर दिसून येत होती. स्वराज्याचे रक्षण करण्यासाठी राजे सदैव दक्ष असत. आम्हा विद्यार्थ्यात आज शूरपणा, धाडस व प्रखर राष्ट्रप्रेम यांचा अभाव आहे. पण ते सर्व गुण शिवरायांच्यामध्ये ओतप्रत भरलेले होते. तो विशाल राजांचा पुतळा जणू मला सांगत होता, वृत्ती अशी खंबीर असावी जशी आंमची आहे. जीवनाचा पाया खंबीर असावा, मनाची भरारी उंच असावी आ-णि त्यास पराक्रम व स्वदेशप्रेम यांची सदैव साथ असावी.

मी पाहिलेल्या या सर्वच दृष्यांचा माझ्या मना-वर खोलवर परिणाम झाला. भारावलेल्या आणि सद्-गदीत झालेल्या माझ्या श्रद्धाळू मनाने माझे हात पुन्हा एकदा राजांच्या मूर्तीस वंदन करण्यास जुळले. आपल्या हिंदवी स्वराज्याच्या वंदनीय शिवरायांची स्मृती माझ्या मनात अखंड कोरली गेली. किल्यावरील शिव-कालातील अजूनही मोडकळीस आलेली मोठी बाजार-पेठ, बाजारपेठेची एकंदर रचना पहाताच मी आश्च-र्याने थक्क झालो. बाजारपेठेची रचना अतिशय प्रमा-णबद्ध, चौथऱ्यावर दुकाने ओळीने कौशल्यपूर्ण मांडलेली दिसत होती. बाजारपेठ पाहिल्यावर इतकी उत्कृष्ट रचना, मधून प्रशस्त मार्ग, या कल्पना तेव्हा कशा सु-चल्या याचे आश्चर्य वाटते. सध्या त्या ठिकाणी केवळ पडझडीच्या स्वरूपात दुकानांच्या भिंती, दूरपर्यन्तचा असलेला दुकानांचा मजबूत चौथरा इतकाच भाग पाहण्यास मिळतो. किल्यावरील त्यावेळची पाण्याच्या साठ्याची व्यवस्थाही पाहण्यासारखी आहे. पाण्यासाठी प्रशस्त असा तलाव बांधलेला दिसतो. तलाव भरपूर खोल असून आजही पाणी वापरण्यास योग्य आहे. किल्यावरील या तलावात राजांचे ३६ मण सोन्याचे रत्नजडीत सिंहासन टाकल्यात आले आहे. अशी समजूत होती; पण प्रत्यक्ष पहाणी केल्यानंतर सिंहासन आढळून आलेले नाही. किल्याच्या एका टोकास असणारा वाघ जबडाही पाहण्यासारखा आहे. खाली वाघ जबड्यात पाहिल्यावर अतिशय गर्द झाडी व प्रचंड खोली आहे हे दिसून आले. किल्यावरील सभोवतालचा बराचसा परिसर, अनेक लहानमोठी खेडी दिसत होती. किल्यावर युद्धप्रसंगी पाण्याचा राखीव साठा करण्यासाठी काही गुप्त विहीरी बांध-ल्याचे दिसून आले. तसेच इतर किल्यावर जाण्यासाठी तयार करण्यात आलेले भूमिगत मार्गही पाहिले युद्ध-कैदी व गुन्हेगार याना कोंडून ठेवण्यासाठी जमिनीत गुप्त ठिकाणी मोठे कैदखाने बांधल्याचे दिसले. युद्धप्र-संगी दीर्घकाळ धान्य साठवून ठेवण्यासाठी भूमिगत धान्यकोठारे बांधलेली पाहणीमध्ये दिसून आली. ही एकंदर सर्व कल्पकता, नियोजन, सर्वत्र असलेली मजबूत व अवघड बांधणी पाहून शिवराय व त्यांचे सवंगडी यांच्या कर्तृत्वाची कल्पना येईल. किल्यावर शिवरायांचे भक्तिस्थान व प्रेरणादाती भवानीमाता, आजही भवानीमंदीर पाहण्यासारखे आहे. किल्यावर सर्वत्र मला दिसून आलेले खोदकाम, हस्तकलाकुसर, मजबुत बांध-काम, देवालये व इमारतीमधील कोरीवकाम या गोष्टी हिंदवी स्वराज्याचा पाया व त्याची जडणघडण यांची कल्पना आणून देतात. आमच्याच बांधवानी एकेकाळी केलेले ते महान कार्य व आजच्या पिढीतील त्यांच्या वंशजांचे आजचे निरर्थक जीवन पाहून अंतःकरणात कोठेतरी खटकू लागते.

मला रायगडावर पाहिलेल्या सर्वच दृष्यानी शिवकालाची मोठी ओळख करून दिली, तो ज्युनिअर कॉलेज मधील सहलीचा प्रसंग माझ्या जीव-नात अत्यंत मोलाचा आहे. कृतज्ञपणे मी तो प्रसंग जतन करून ठेवला आहे. कितीवेळा तरी ती रायगड-वरील दृष्ये मला शिवरायांच्या कर्तृत्वाची, त्यांच्या शूर मावळ्यांची व हिंदवी स्वराज्याची आठवण करून देतात, मला सुखवून जातात. सहलीच्या निमित्ताने माझ्यावर साक्षात्कार घडविणारे हे गवसलेले क्षण, 'इतिहासाचा वारसा असाच पुढे चालावा,' असे सांग-तात. जीवनाचे ते दीपगृह आहेत आणि हे प्रसंग काही कालावधीतच घडतात. पण कायमचे असे काहीतरी मागे ठेवून जातात.

जेंव्हा मी कंटाळलेला असतो, रिकामा असतो तेंव्हा गावाबाहेर हिरण्यकेशीकाठी निसर्गाच्या सान्नि-ध्यात फिरावयास जातो. जीवनातील स्मृतीचा उजाळा अशा शांतवेळी मनात तरंगू लागतो, तेंव्हा ह्या सोनेरी क्षणांची दृष्ये मांडून मी त्यांच्याशी हितगुज करण्यात रमून जातो. ● ● ●

# ' बेकार '

महादेव नाडगोंडे
(महागांवकर)
तृतीय वर्ष, वाणिज्य.

" बेन्बा, पेट और पेट के नीचेवाला ये तुकडा जो न होता, तो ये दुनिया कितनी हसिन बन जाती!" काल रात्रीच एका कादंबरीत वाचलेलं वाक्य केराप्पानं आपल्या मनाशी परत एकदा घोळलं आणि गोधडी कांबळीचं अस्ताव्यस्त झालेलं अंथरूण घाईघाईन गुंडाळायला सुरुवात केली. त्याला आज उठायला खूपच उशीर झाला होता. म्हाताऱ्या आईनं त्याला हलवून उठविल नसतं; तर तो आणखी तासभर उठला नसताही कदाचित; पण त्याला तसं करून चालणार नव्हतं. पदवीपर्यंत शिकूनही नोकरी न मिळाल्यानं आपण म्हाताऱ्या आईच्या पोटाला घास घालू शकत नाही याची खंत त्याला सतत वाटत होती. पण आज त्यानं मनाशी एक निर्णय घेतला होता आणि आईच्या हाकेला त्यान डोळे उघडले होते. – – –

बिछाना गुंडाळून तो घराच्या ठेंगण्या घरातून बाहेर आला; तेव्हा पिवळ धमक झालेल ऊन कडक तापू लागलं होतं. दारासमोरच्या झाडाची लांबट, गर्द काळी सावली वाळत घातलेल्या ढोराच्या कातड्या– सारखी दारासमोर पसरली होती. झोपेनं किलकिले झालेले त्याचे डोळे दिपले होते. तो तसाच आत गेला· घाईघाईनं सकाळचे सगळे विधी, आंघोळ आटोपून त्यान फाटकी हिरवी बेलबॉटम आणि फिकट निळ्या रंगाचा त्यातल्यात्यात धड वाटणारा मॅनिला घातला. तोवर त्याच्या आईनं जेवण शिजवून ठेवलं होतं· एका थाळीत वाढून देत ती म्हणाली,

" बाबारं घरातली सगळी अन्नवस्तू सरत आली. कसबसं दोन दिवस पोटाला मिळल. आता असं घरात बसून जमाव कसं?" तसा उदासवाण्या आवाजात केराप्पा म्हणाला,

" बघतेस नव्ह! पोटाला मिळवायसाठी जेवढं

राबता येईल तेवढं राबतोय मी. आणखी काय करू? कायमरुपाची नोकरीच कुठं मिळत नाही. कसलीच लायकी नसलेल्या माणसांच्याही पायावर नोकरीसाठी मस्तक घासून घासून कपाळाची सालं गेली!" तसं म्हातारीच्या पोटात गलबलून आलं.म्हाताऱ्या डोळयात पाणी तरारलं. विझत आलेल्या निखाऱ्यावर पाणी मारता मारता ती म्हणाली,

"तुला कशाला दोष देऊ पोरा! दोष नशीबाला देतीया मी. लहान पणा पास्न हाडाची काड करून पोट भरत चार बुक शिकलास –– केवढं कवतिकाचं वाटलं मला! वाटलं, आता तरी दोन दिवस सुखाचं येतील. पोटाला दोन घास खायला मिळंल. अंगावर वर्षाकाठी एखादं धडुतं मिळंल. पण कशाच काय अन् कशाच काय?"म्हातारीनं निखाऱ्यावर पाणी शिंपताच भस्कन् धूर उसळला अन् निखाऱ्यांचे कोळसे झाले! म्हातारीच्या इच्छा कधीकाळी अशाच निखाऱ्यासारख्या धगधगत्या होत्या. आज त्यांचे कोळसे होऊ पाहत होते. घाईघाईनं केराप्पानं पोटात चार घास लोटले. तांब्याभर पाणी घटाघटा नरडयात ओतलं आणि पानावरून उठत तो म्हणाला,

" मी आज साखर कारखान्यावर जातोय. बघू कांही कामाच होतं की काय? मला यायला उशीर होईल. माझी वाट बघू नकोस." त्यानं सांगितलं आणि तो भिंतीला बसविलेल्या पारा गेलेल्या आरशासमोर उभा राहून गेल्या काही दिवसात खूपच पिकलेले केस विंचरू लागला. काहीशा गोल, चौकोनी चेहऱ्याची गालाची हाडं अर्धपोटी उपासानं वर आली होती. प्रकृती खालावली होती. मुळात उंच असलेल्या त्याची उंची अधिकच वाटत होती. पायात फाटक्या स्लीपर घालून तो बाहेर पडणार तोवर म्हातारीनं विचारल,

"कारखान्यावर कसलं काम बघणार आणी!"

" नोकरी कसली मिळती ग! बघाव म्हणतो एखादं लहान हॉटेल निदान पानाचं गादी तरी टाकता येते कां!" काहीशा त्राग्यातच तो म्हणाला. ते ऐकून म्हातारीन सुस्कारा सोडला आणि कपाळाला हात लावून ती म्हणाली,

" एवढं राबून, शिकून आणी नशिबात कप–बशाच विसळण आलं व्हयरं?"

"च्यायला! आपल नशीबच जिथं तिथं मांजरासारख आडवं जात त्याला काय करू?" म्हणून तो स्वतःशीच तणतणत बाहेर पडू लागला तोच दाराची ठेंगणी चौकट त्याच्या डोक्याला जोरात धडकली. डोक्यातून चांगलीच कळ उठली. शकूनापशकूनावर त्याचा विश्वास नव्हता तरीही त्याच्या मनात आलं,

'घरातनं पाय बाहेर घालतानाच ठोकर बसली. आता पुढं काय होतं कुणास ठाऊक!'

ठणकणारं कपाळ चोळतच तो बाहेर पडला मैल दोन मैलाच अंतर उन्हाच चालत जाण्याऐवजी सायकलीने जाव म्हटलं तरी खिशात फुटकी कवडीही नव्हती. काय करायचं? अधिक ऊन होण्यापूर्वीच कारखान्यावर पोहोचावं म्हणून तो तसाच चालत राहिला – –

मे महिन्याचे दिवस. सकाळी दहा अकराच्या सुमारालाच अंगातून घामाच्या धारा वाहू लागायच्या. वरून ऊन आग ओकत असायच. त्यात गावापासून कारखान्यापर्यंत रस्त्यावर कुठं खुरटं झाडही नाही. वरून तापणाऱ्या उन्हाच्या झळांनी डोळयांना अंधारी यायची. तशा रखरखत्या उन्हातून तो कारखान्याकडे निघाला भऱ्या विस्तीर्ण माळावर कारखान्याची नव्यान उभारलेली प्रचंड वास्तू तळपत होती. चढत्या उन्हात लखलखणाऱ्या निळया आकाशात धुराडयातून निघालेला धुराचा काळ लोट मार्ग आक्रमत होता. तो कारखा–न्याच्या आवारात आला आणि त्याच्या नजरेला आग ओकणाऱ्या भट्टया भोवती काम करणारे कामगार, चेनवर ऊस घालणारे मजूर, मशीनरूम भोवती घोटा–ळणारे तंत्रज्ञ, नव्या बांधकामावर काम करणारे मजूर यांची धांदल दुरूनच दिसू लागली. ऊस क्रशिंगचा खडखडाट होत होता. समोरच्या विस्तीर्ण मैदानात ऊस घेऊन आलेले ट्रक्स, ट्रॉलीज, ट्रॅक्टर, बैलगाडया त्याभोवती रेंगाळणारी पोरं यांची रांगच्या रांग उगव-तीला असणाऱ्या काजूच्या बागेपर्यंत पसरली होती. दोन तीन वर्षापूर्वी निर्मनुष्य असणारा माळ आता जागा

झाला होता.

तोंडावरुन घामाचे ओघळ वाहत असलेला, उन्हानं चर्या लालबुंद झालेला केराप्पा वॉचमनच्या परवानगीनं गेट मधून आत गेला आणि सरळ एम. डी. च्या केबिनच्या रोखानं चालू लागला. केबिन बाहेर टाकलेल्या लाकडी बेंचवर बसत त्यानं शिपायाकडे चौकशी केली. शिपायानं थोडा उशीर थांबायला सांगितलं. कांही उशीर तो केबिनच्या बंद दरवाजावर असलेल्या एम. डीं. च्या नेमप्लेटवर नजर खिळवून बसून राहिला. थोडचा अवधीतच त्याला आतून बोलावणं आलं. स्प्रिंगचा दरवाजा लोटून तो आत गेला एम्. डी. नी. फाईलमध्ये घातलेलं डोकही वर काढलं नाही. क्षणभर वाट पाहून त्यानं नमस्कार केला. मान वर न करताच त्यांनी विचारलं,

" बोला, काय काम होतं? "

" साहेब, एक महत्वाचं बोलायच होतं आपल्याशी – –" तो अजुनी हात जोडून उभा होता न्यायाधिशापुढे उभ्या असलेल्या आरोपीसारखा ! साहेबांचा अधिकार गुरगुरला,

" अहो त्यात काय ! येणारा प्रत्येकजण माझ्याशी महत्त्वाचच बोलत असतो! हे पहा जे सांगायचं असेल ते थोडक्यात सांगून टाका! मला अधिक वेळ नाही! " त्यांच्या कडक शद्बांनी तो बावरून गेला. क्षणभर त्याला काहीच सुचलं नाही. मग धीर करून तो म्हणाला,

"साहेब, मी नोकरी मागण्यासाठी आलो नाही – – या आवारात छोटस हॉटेल किंवा पानाची गादी काढावी म्हणतो. त्यासाठी मला जागा हवीय! " त्या सरशी एम डी. नी सांगितलं,

"अर्ज दिला असेल तर वर चेअरमनसाहेबांच्या कडे पाठवितो. नसेल तर लिहून द्या. समक्ष चेअरमनना भेटा. ते म्हणतील ते सारं नीट समजावून घ्या. नाऊ यू कॅन गो! टाईम इज ओव्हर! " दोन वाक्यातच त्यांनी मुलाखत संपविली. केराप्पा हताश मनानं तिथून बाहेर पडला. तसाच तो चेअरमनना भेटण्यासाठी निघाला. एवढयात खुद्द चेअरमनच बाहेर आले आणि कारगाडीत बसले. त्याची भेट न होताच ते निघाले. तो तसाच धावला. एवढयात कार स्टार्ट होत होती. उजवा हात उंचावित तो धावला आणि मागच्या खिडकीतून तोंड आत नेत म्हणाला,

" साहेब, एक मिनीट आपल्याशी बोलायच होतं! "

" बोला मुद्याच तेवढं बोला. मला अधिक वेळ नाही! " साहेबांनी घडयाळ पहात सांगितलं. तो अजिजीच्या स्वरात म्हणाला,

" साहेब, मला कँटीनसाठी किंवा पानाच्या ठेल्यासाठी जागा पाहिजे. त्या बाबत एम डी.साहेबांनी आपली भेट घ्यायला सांगितल आहे! " साहेबांनी एक वार त्याला चांगल निरखलं त्यांनी विचारलं,

" यापूर्वी तुम्ही एकदा भेटला होता ना?', त्यांच्या प्रश्नान त्याच्या मनात आशा पालविली.

" होय, त्यावेळी नोकरीसाठी मुलाखत द्यायला आलो होतो; पण नाही मिळाली नोकरी! "

" शिक्षण काय झालय? "

" आर्टसचा पदवीधर आहे, साहेब! " त्यानं उत्तर दिले.

" मला वाटत बी. एस. सी झाला असता तर बर झाल असत. मग एवढं पदवीधर होऊन हॉटेल घालणार की काय? " साहेबांच्या आवाजात काहीसा उपहास होता. तुच्छता होती गरीब, लाचार आवाजात त्यान उत्तर दिले,

" वशीला नाही म्हणून नोकरी मिळत नाही तर काय करायच साहेब? शेवटी पोटाला दोन घास कसे मिळतील हेच बघायच! "क्षणभर त्याच्या दोनवाण्या चर्येवर साहेब नजर खिळवून राहिले. त्यांनी विचारल;

" एवढं शिक्षण घेऊन हेच करायच होतं, तर शिकलात तरी कशासाठी?"

" हा प्रश्न मी स्वतःशीच विचारला अनेक वेळा. पण त्याचं उत्तर सापडत नाही! आता मात्र शिकल्याचा पश्चाताप होतोय, त्यापेक्षा अशिक्षित राहून शेतात मजुरीसाठी राबलो असतो तर! 'शिकलो कशा-साठी?' हा प्रश्न तरी मनाला छळत राहिला नसता!' त्यान सांगितलं. साहेबांनी परत घड्याळ पाहिलं आणि ते म्हणाले.

" हे पहा! मी तुमच्यासाठी काही करू शकत नाही. कँटीन वगैरेच्या क्षेत्राची जबाबदारी आनंदराव देसाई यांच्यावर सोपविली आहे. इथून दोन मैलावर त्यांच्या मळा आहे, त्यांना जाऊन भेटा. ते योग्य मार्गदर्शन करतील!" साहेबांनी थंड आवाजात सांगितल आणि गाडी स्टार्ट केली बघता बघता साहेबांची गाडी भर्रकन् गेट बाहेर निघून गेली होती.– –

खालच्या मानेनं केराप्पा तिथून चालू लागला आणि भर दुपारच्या उन्हात तो आनंदराव देसाई यांच्या मळ्याच्या दिशेन निघाला. चांगली अर्धातास पायपीट केल्यानंतर फोंडामाळ संपला आणि त्याची वाट गर्द झाडीत दाटलेल्या ऊस मळ्याच्या शिवारात शिरली. काही ऊस तोडला होता. काही ठिकाणी ऊसचा फड पेटविला होता. मध्येच नव्यानं लावण केलेल्या उसात बगळे उतरत होते. काही ऊस अजुनी तोडणीची वाट पाहत उभा होता. त्या मळ्याच्या कडेन नदीच्या काठान तो चालत राहिला. थोड्या वेळातच तो आनंदराव देसाईयांच्या ऊस मळ्याच्या आवारात आला समोरच बंगलावजा कौलारू घर आणि भवतीं ऊसाचे रान, वेलची, केळयाची, पेरूची बाग असलेला तो परिसर आनंदरावांचा श्रीमंतीचा दरारा दाखवीत होता. तो आत गेला. एवढ्यात त्याच्या कांनावर कुत्र्यांच्या भुंकण्याचा आवाज आला. पाठोपाठ झेपा घेत आलेल्या कुत्र्यानं त्याच्या पँटची तंगडीचा फाडली. तो घाबरून जाग्यालाच थांबला. एवढयात गड्यानं त्या कुत्र्याला आवरून धरलं आणि विचारलं,

" काय काम होतं?"

" साहेबाना भेटायच होतं?" धाप आवरत केराप्पा बोलला.

" असं कां! मग जरास थांबा. सायेब येयाल्ल आता! ' गड्यान गुर्मीतच सांगितलं आणि तो बंगल्यात जायला निघाला. एवढयात केराप्पान त्याला हाक मारली.

" जरासं पाणी देता? तहान फार लागलीय हो!" गडयान डोळे मोठे केले. भुवया नाचवित त्यानं विचारल.

' अस्सं? लईच तहान लागली कां? मग मसाला घालून दूध दिल तर न्हाई का चालायचं? अरं एवढा नदी काठान आला हायिस अन् नरडयाला कोरड पडली व्हयर! "एवढ्यात बंगल्यातून वाघाच्या आरोळी सारखी हाक आली. तसा जीऽ ' म्हणून गडी धावला आणि केराप्पान हताशपणे कपाळाला हात लावला.

थोड्या वेळातच आनंदराव देसाई बाहेरच्या व्हरांडयात आले तसा तो चटकन् उभा राहिला आणि त्यानं नमस्कार केला. विस्तीर्ण आराम खुर्चीत ऐसपैस पसरत आनंदरावनी विचारल,

" कुठून आलास?" केराप्पानं गाव सांगितल पाठोपाठ दुसरा प्रश्न.

" काय काम काढलंस?" केराप्पान अडखळत सांगितलं,

" काही नाही – – कारखान्याच्या आवारात एखादं हॉटेल किंवा पानाच दुकान काढावं म्हणतो!',

" तुला माझ्याकडं कुणी पाठविलं ? "

" चेअरमन साहेबांनी ! " केराप्पा उभा राहूनच बोलत होता,

" आयला ह्या चेअरमनच्या ! किती बदनाम करल आम्हाला ! आणि मग त्याच्याकडे जायच्या

आधीच माझ्याकडे का नाही आलास? आधी गुरवाकडं मग देवाकडं ह्यो रिवाज कुठला? बर. ते असू दे. पैसे किती आणलास?" त्या प्रश्नान केराप्पाच्या डोळया–समोर भोवळ आली. तारे लखलखले.सारं जग आपल्या भोवती गरगरा फिरतय असं वाटल. तो काही बोलला नाही. नुसता!! खाली मान घालून उभा राहिला.तसा परत आनंदरावांचा आवाज घुमला,

- "काय रे उत्तर नाही दिलंस?– –केराप्पाच्या डोळयात पाणी तरारल

"साहेब, एवढया लौकर हा व्यवहार ठरेल हे माहित नव्हतं पैसे आणले नाहीत." तो बोलला.

"राजा, व्यवहाराची गोष्ट दूर आहे अजून! कांही दक्षिणा आणलीस का? मग कशाला आलायस? कितवी पर्यंत शिक्षण झालय तुझं?" त्यांनी आपल्या मिशा कुरवाळीत विचारल.

"बी. ए. पर्यंत झालंय!"

"अस्स! मग नोकरी का नाही केलीस?" परत प्रश्न. तसा ताडकन् केराप्पा बोलला,

"नोकरी मिळत नाही. वशीला आणि लाच द्यायला पैसा नाही म्हणून नोकरी मिळत नाही!" जशी सोडयाची बाटली फुटावी तसे आनंदराव हसले डोळयात पाणी येईपर्यंत हसत राहिले, धोतराच्या सोग्यानं पाणी पुसत ते बोलले,

"चांगला विनोद केलास, पोरा! पण काय रे– –आमच्या शेतात राबायला राहशील का? रोजाना दोन रुपये पगार! बघ लाच न घेता नोकरी देतो! बोल तयारी आहे? माहिताय पोरा तू नाही म्हणणार! अरे शिकलेली पोरं तुम्ही! ह्या पँटा न उतरता पैसे कसे मिळतील ते बघणार. शेतात राबायला नको. पण काय रे? एवढं शिकून शेवटी कपबशा विसळायला लाज नाही वाटत?"त्या शब्दांनी त्याचा अभिमान दुखावला खचल्या आवाजात तो म्हणाला,

"साहेब, त्यात कसली आलीय लाज? स्वत:चा धंदा झाला की झाल आणि एवढा शिकलो ते हॉटेलमध्ये कपबशा: विसळत,! मिळेल ते कष्टाच काम करतच! एवढा कष्ट करून शिकलो पण पदरात काहीच पडलं नाही साहेब. शेवटी नशिबात कपबशा विसळणच असेल तर त्याला काय करायच? बघा साहेब, तुम्हाला देव समजून तुमच्या दारात आलोय. असे दूर लाथाडू नका!" त्यावर आनंदराव बोलले,

"अरे दूर कुठं लाथाडतोय तुला? आणि काय रे देव समजून आलायस तर मोकळया हातांनी कसा आलास? तुझं काम होईल· पण सहासात हजार खर्चावे लागतील मग शिवाय जागेची किम्मत – – सर्व साधारण तुला पंचवीस हजार तरी खर्च येईल नाही?" तो आकडा ऐकून त्याची छाती दडपून गेली. त्याच्या मनात आलं; एवढा पैसा आपल्याजवळ असता तर यांच्या दाराशी कशाला आलो असतो? त्याची मान नकारार्थी हलत राहिली. डोळयातून पाणी टपकू लागल. गुदमरल्या आवाजात तो म्हणाला,

"साहेब, आम्ही तुम्हाला देव समजत होतो – – आज समजल, देवदेखील सोन्याच्या सुरीसाठी आपलंच पोट पुढ करतात ते! या सुंदर परिसरात राहणाऱ्या माणसाजवळ थोडसा तरी माणुसकीचा ओलावा असेल देव माणस इथं राहत असतील अस वाटल होत. पण–पण साहेब, तो सगळा भ्रम ठरला. इथं रक्ताला चटावलेली जंगली जनावर राहतात; हे माहिती असतं तर इथं आलो नसतो. इथं आलो आणि तुमच्या इमानी कुत्र्यानच माझा चावा घेतला. दु:ख त्याच; त्याचं नाही झालं; ज्याला मोठा समजत होतो तो जनावरा पेक्षाही हलकट निघाला याच दु:ख झालं – –" तसे आनंदराव बंदुकीच्या बारा सारखे कडाडले'

"आय से गेट आऊट! आय से गेट आऊट! – – हरामी कुत्रा, आम्हालाच अक्कल शिकवितो – – शिरप्या, भडव्या, ऐकत काय उभा आहेस? धक्के मारून हाकलून लाव – –" आणि आनंदराव ताडकन् निघून गेले. केराप्पाला गडयान धक्के मारून बाहेर घातल – –

हताश झालेला केराप्पा परत त्या फुफाटयातून चालू लागला. चार पावल चालण्या इतकही बळ त्याच्या पायात राहिलं नव्हतं. त्याचे पाय खुरडत होते वरून ऊनं रणरणत होतं – – तो चालत राहिला घशाला कोरड पडली होती – – त्याची जड पावलं तशीच चालत राहिली – – तो नदी काठाला आला. नदी पार कोरडी पडली होती. त्याला भयंकर तहान लागली होती. डोळयासमोर काजवे चमकले. – – छातीत जोराची कळ आली. डोळयासमोर काजवे चमकले-छातीत जोराची कळ आली. डोळयासमोर अंधार पसरला आणि – – आणि भान हरपून केराप्पा धाडकन् खाली कोसळला! ●●



# समता आणि लोकशाही

## डॉ. आंबेडकरानी दिलेली— विकासाची विचार गंगा

रामचंद्र ईश्वर बारामती
बी. ए. भाग ३

